# महिला व बाल विकास आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य,पुणे.

२८, राणीचा बाग, जुने सर्किट हाऊस जवळ,पुणे-४११ ००१.

Email: dcmahilavikas@gmail.com


जा.क्र.मबाविअपु/मसकेंपु/आदिशक्ती/संगणकीय कार्यप्र/पुआ/२०२५-२६/ १०१४ दि. १८ फेब्रुवारी, २०२६

प्रति,
जिल्हाधिकारी, (सर्व)

विषय: महिला व बालकांच्या सक्षमीकरणासाठी आदिशक्ती अभियान अंतर्गत ग्राम पंचायतींना आदिशक्ती पोर्टलवर अर्ज सादर करण्यासाठी मुदतवाढ देणेबाबत.

संदर्भ: या आयुक्तालयाचे पत्र क्र.मबाविआ/म.वि./आदिशक्ती २०२५-२६/का-६/५४९ दि.२.२.२०२६

राज्यातील महिलांच्या सक्षमीकरणासाठी आदिशक्ती अभियान राबविणे व आदिशक्ती पुरस्कार प्रदान करणेबाबत शासनाने दि.२२ मे, २०२५ रोजी शासन निर्णय निर्गमित केलेला आहे. या अभियानाद्वारे महिलांसाठी राज्यात राबविण्यात येत असलेल्या विविध शासकीय योजना/उपक्रम/कार्यक्रम इ. बाबत ग्राम पंचायत पातळीवर मुल्यमापन करुन ग्रामस्तरीय समित्यांना आदिशक्ती पुरस्कार देऊन गौरविण्यात येणार आहे.

आदिशक्ती अभियान राबविणे व पुरस्कारासाठी स्पर्धेत सहभागी होण्याकरिता या आयुक्तालयस्तरावरुन https://wcdadhishakti.in हे संकेतस्थळ उपलब्ध करुन देण्यात आलेले आहे. या संकेतस्थळावर ग्राम पंचायतींना स्पर्धेत सहभागी होण्यासाठी अंतिम मुदतवाढ देण्यात येत असुन **दि.२२ फेब्रुवारी, २०२६ रोजी रात्री १२.०० वाजेपर्यंत** पुरस्कारासाठी स्पर्धेत सहभाग नोंदविण्यासाठी पोर्टल खूले असणार आहे.

तसेच यापुर्वीच सर्व तालुका व जिल्ह्याचे ID Password उपलब्ध करुन देण्यात आलेली आहेत. तालुकास्तरीय समित्यांनी सदरच्या संकेतस्थळावर संगणकिय कार्यप्रणालीद्वारे उपलब्ध करुन देण्यात आलेल्या गुणानुक्रमे केवळ प्रथम पाच ग्राम पंचायतींची तपासणी करावयाची आहे. तपासणी अंती पहिल्या ५ क्रमांकामधील ग्राम पंचायत अपात्र ठरत असल्यास पुढील गुणानुक्रमे ५ ग्राम पंचायतींची तपासणी करुन त्यांचे अंतिम गुण व समितीचे अभिप्राय तपासणीअंती खात्री करुन **दि.२८.०२.२०२६** पर्यंत पोर्टलवर नोंदविण्यात यावेत.

त्याचप्रमाणे जिल्हास्तरीय समितीने **दि.०१ ते ०८ मार्च, २०२६** पर्यंतच्या कालावधीत जिल्ह्यातील प्रथम ५ ग्राम पंचायतींची पडताळणी करुन डॅशबोर्डवर ऑनलाईन पध्दतीने आपले अभिप्राय नोंदवावयाचे आहेत. त्यानुसार आयुक्तालयस्तरावरुन राज्यस्तरीय पुरस्कारासाठी तपासणी करण्यात येणार आहे याची नोंद घ्यावी.

(नयना अर्जुन गुंडे) भा.प्र.से.
आयुक्त,
महिला व बाल विकास,
महाराष्ट्र राज्य,पुणे.

प्रत: माहितीस्तव सविनय सादर.
मा.सचिव, महिला व बाल विकास, महाराष्ट्र शासन,मुंबई.
प्रत: कार्यवाहीस्तव.
१.मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, सर्व.
२.विभागिय उपआयुक्त, महिला व बाल विकास, सर्व.
३.जिल्हा कार्यक्रम अधिकारी, (मबाक), जिल्हा परिषद, सर्व.
४.जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी, सर्व.